



# पारनेर दर्शन






वर्ष ४ , अंक ६३ , रविवार, २६ एप्रिल २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



# "मीच विधानसभा लढणार!"



## ♦ खा. नीलेश लंके यांची गर्जना ♦ लोकसभा 'जिरवण्यासाठी' लढविली ♦ २०२९ ला मुंबईकडे वाटचाल ♦ पारनेर दौऱ्यातून कार्यकर्त्यांना आक्रमक आदेश ♦ पारनेरमध्ये शक्तिप्रदर्शन ♦ जल्लोषात दौऱ्याची सुरुवात

**भाळवणी, कर्जुले हर्या : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असताना खासदार नीलेश लंके यांच्या दौऱ्याने या हालचालींना वेग आला आहे. शनिवारी सकाळी पारनेर शहरात झालेल्या स्वागत सोहळ्याने या दौऱ्याला शक्तिप्रदर्शनाचे स्वरूप प्राप्त झाले. फटाक्यांची आतषबाजी, घोषणाबाजी, आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती यामुळे शहरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दौऱ्याची औपचारिक सुरुवात झाली.

### पुढील दौरे आणि मेळावे

*टाकळी ढोकेश्वर येथे पुष्पवृष्टीत स्वागत झाल्यानंतर कर्जुले हर्या येथे मेळावा पार पडला. पुढील काळात प्रत्येक गटात बैठका घेऊन स्थानिक प्रश्न, उमेदवारी आणि प्रचाराची दिशा ठरवली जाणार आहे.*

### गटानिहाय दौऱ्याची रणनीती

*या दौऱ्याची सर्वात महत्त्वाची बाजू म्हणजे 'गट व गण'निहाय आखलेली सूक्ष्म रणनीती. ढवळपुरी आणि टाकळी ढोकेश्वर या गटांपासून सुरू झालेल्या बैठकींमध्ये प्रत्येक गणातील स्थानिक समीकरणांचा स्वतंत्र आढावा घेण्यात आला. प्रत्येक बैठकीत मागील निवडणुकीतील मतांचे विश्लेषण, बुथनिहाय ताकद आणि कमकुवत बाजू स्थानिक प्रश्न आणि मतदारांच्या अपेक्षा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.*

### विधानसभा मीच लढणार

*सभेत बोलताना लंके यांनी स्पष्ट शब्दांत घोषणा केली कुणाची तरी जिरवायची होती म्हणून लोकसभा निवडणूक लढविली; आता येणारी विधानसभा निवडणूक मी स्वतः लढणार आहे. यासोबतच त्यांनी २०२९ मध्ये मुंबईत सक्रिय राजकारण करण्याचे संकेत दिले. या विधानामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असून, तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.*

### संघर्ष करा, आंदोलन करा

*कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना लंके म्हणाले ज्या ठिकाणी अन्याय होईल, तिथे संघर्ष करा. गरज पडली तर आंदोलन करा. धाक निर्माण करा. ते पुढे म्हणाले, निवडणुका झाल्यानंतर कोणी कोणाला विचारत नाही. त्यामुळे गावागावात संघटित होऊन जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करा. तुमच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे.*

### रेसच्या घोड्यासारखे काम करा

*लंके यांनी कार्यकर्त्यांना प्रेरित करताना स्वतःचा अनुभव सांगितला मी आजही २०-२० तास काम करतो. कार्यकर्त्याने रेसच्या घोड्यासारखे काम केले पाहिजे. या विधानामुळे उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला.*



### पारनेरमध्ये निवडणुकीचा बिगुल

*खा. नीलेश लंके यांच्या दौऱ्यामुळे पारनेर तालुक्यात निवडणुकीची रणधुमाळी अधिकच तीव्र झाली आहे. आक्रमक भूमिका, स्पष्ट लक्ष्य आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद यामुळे संघटन पुन्हा सज्ज झाले असून, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये पारनेर तालुका केंद्रस्थानी राहणार, हे स्पष्ट झाले आहे.*

### झाले गेले गंगेला मिळाले

*विधानसभा निवडणुकीनंतर आलेल्या मरगळीकडे लक्ष वेधत लंके म्हणाले मी काही काळ 'वेट अँड वॉच'मध्ये होतो. पण आता पुन्हा मैदानात उतरलो आहे. नकारात्मकता बाजूला ठेवा. सकारात्मकतेने कामाला लागा. आपण सर्व मिळून तालुक्याला उंचीवर नेऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.*

### युवक, शिक्षण आणि रोजगारावर भर

*युवकांसाठी उद्योग शिबिरे, एमआयडीसीसाठी प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, गरजूंच्या फी भरणे, अपंगांना सक्षम बनविणे अशा विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. पदाधिकाऱ्यांनी असे काम करावे की पदाची प्रतिष्ठा वाढेल, असे सांगत अंतर्गत मतभेद दूर करण्याचा सल्ला दिला.*

### विकासकामांचा आढावा

*आपल्या कामगिरीचा उल्लेख करताना लंके यांनी सांगितले २ हजार कोटी रुपयांची विकासकामे, १.५१ लाख नागरिकांना वैयक्तिक मदत, दरमहा १५-२० लाख रुपयांची रुग्णालयीन मदत, मुख्यमंत्री व पंतप्रधान सहायता निधीतून सर्वाधिक लाभ दिला.मी राजकारण नाही, समाजकारण करतो, असे सांगत त्यांनी विरोधकांवर टीका केली.*

### मनोगते : कार्यकर्त्यांचा विश्वास, संघटनाला बळ

**डॉ. राजेश भनगडे :** *तरुणांचा उत्साह मोठा आहे; हा उत्साह मतदान केंद्रांवर दिसला पाहिजे. बुथनिहाय प्रशिक्षण आवश्यक.*

**सतीश भालेकर :** *राष्ट्रवादी आणि लंके प्रतिष्ठान या एकाच नाण्याच्या दोन बाजू. दरमहा गटानिहाय बैठकांचे नियोजन.*

**बाबाजी तरटे :** *मरगळ दूर करण्यासाठी हा दौरा निर्णायक. ३६५ बुथवर बीएलए नेमणूक करावी.*

**अर्जुन भालेकर :** *लंके हे कधीही न संपणारे रसायन; विजय निश्चित.*

**गंगाराम बेलकर :** *दौऱ्यामुळे चैतन्य; निवडणूक नियोजनाला दिशा.*

**अॅड. राहूल झावरे :** *कार्यकर्त्यांची निष्ठा कायम; हीच खरी ताकद.*

**मोहन रोकडे :** *दौऱ्यामुळे विरोधकांची झोप उडाली; सुपडा साफ करण्याचा निर्धार.*

**इतर प्रतिक्रिया (संक्षेप)**

*पोपट गुंड, अशोक घुले, सोनिया राजदेव, भरत आंधळे, अभिजित झावरे, प्रकाश राठोड, संदीप ठाणगे, बापूसाहेब शिर्के यांनीही एकजूट, संघटन आणि बूथबांधणीवर भर देण्याचे आवाहन केले.*

---

# शिरूरमध्ये महिलेची रस्त्यावरच प्रसूती !

## ■ माणुसकीच्या साक्षीने गोंडस बाळाचा जन्म

**शिरूर : प्रतिनिधी**

शहरातील निर्माण प्लाझा परिसरात घडलेली एक हृदयस्पर्शी घटना आजही माणुसकी जिवंत असल्याचा जिवंत पुरावा ठरली. प्रसूती वेदनांनी विव्हळ झालेल्या एका गरीब महिलेला रस्त्यातच बाळाला जन्म द्यावा लागला; पण त्या कठीण क्षणी नागरिक, महिला, डॉक्टर आणि समाजातील विविध घटकांनी दाखवलेली तत्परता पाहून सर्वांचे डोळे पाणावले.



जोशीवाडी येथील ही गरोदर महिला प्रसूती कळा सहन करत शिरूर ग्रामीण रुग्णालयाकडे पायी निघाली होती. मात्र निर्माण प्लाझा परिसरात पोहोचताच वेदना असह्य झाल्या आणि ती रस्त्यातच बसली. क्षणात परिस्थिती गंभीर झाली पण पुढच्याच क्षणी माणुसकी धावून आली!

परिसरातील महिलांनी क्षणाचाही विलंब न करता मदतीला धाव घेतली. कुणी स्कार्फ तर कुणी साड्या आणून रस्त्यावरच सुरक्षित पडदा तयार केला. दरम्यान, ही माहिती उर्वरीत पान ३ वर

# गायत्री मंदिरात भरदिवसा दागिन्यांची चोरी!

## गर्दीचा फायदा घेत ज्येष्ठ महिलेच्या कानातील कर्णफुले लंपास

**नगर : प्रतिनिधी**

शहरातील महाजन गल्लीसारख्या गजबजलेल्या परिसरात असलेल्या गायत्री मंदिर हॉलमध्ये भरदिवसा दागिन्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. घरगुती कार्यक्रमासाठी आलेल्या ७२ वर्षीय महिलेच्या कानातील सुमारे ४० हजार रुपयांची सोन्याची कर्णफुले अज्ञात चोरट्याने लंपास केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत अंजली अशोक देशमुख (रा. पुणे) यांनी २४ एप्रिल रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. देशमुख या १९ एप्रिल रोजी दुपारी नगरमधील गायत्री मंदिर हॉल येथे एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या. दुपारी तीन ते पाच या वेळेत त्या हॉलमध्ये उपस्थित असताना, अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या कानातील सुमारे ५ ग्रॅम वजनाची, ४० हजार ३१० रुपये किमतीची सोन्याची कर्णफुले शिताफीने चोरून नेली.

घटनेनंतर देशमुख यांनी परिसरात शोधाशोध केली; मात्र चोरट्याचा कोणताही माग काढता आला नाही. अखेर त्यांनी कोतवाली उर्वरीत पान ३ वर

# फरार असतानाही 'व्यवहार' सुरूच

## ■ कल्पना खरातच्या नावावर उरणमध्ये लाखोंची जमीन खरेदी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भोंदूगिरी प्रकरणातील मुख्य सूत्रधार अशोक खरात याच्या गुन्हेगारी जाळ्याचे धागेदोरे आता उरणपर्यंत पोहोचल्याचे उघड झाले असून, तो स्वतः तुरुंगात आणि पत्नी फरार असतानाही तिच्या नावावर लाखोंचा जमीन व्यवहार पार पडल्याने महसूल व नोंदणी यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उरण तालुक्यातील चाणजे गावातील सर्व्हे क्रमांक ३७१/३ (क्षेत्र ०.२०.०० आर) ही जमीन अस्मिता अविनाश म्हात्रे आणि कैलास मिश्रीमल शहा यांच्याकडून कल्पना अशोक खरात हिच्या नावावर ५८ लाख ५० हजार रुपयांना खरेदी करण्यात आली. या व्यवहाराचे खरेदीखत १२ मार्च २०२६ रोजी नोंदविण्यात आले.



या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, १७ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी अशोक खरात याला अटक केली, आणि त्याच दिवशी तलाठी सजा चाणजे यांनी या व्यवहाराची वर्दी नोटीस प्रसिद्ध केली. व्यवहाराच्या प्रक्रियेत दाखवलेली ही विलक्षण तत्परता सामान्य नागरिकांच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर अधिकच संशयास्पद ठरत आहे. साधारणपणे सातबाऱ्यावर नाव चढवण्यासाठी सामान्यांना महिनोनमहिने तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात; मात्र या प्रकरणात केवळ एका महिन्याच्या आत, १३ एप्रिल २०२६ रोजी फेरफार क्रमांक ८३५१ मंजूर करण्यात आला.

महत्त्वाचा प्रश्न असा उपस्थित होत आहे उर्वरीत पान ३ वर

---

# 'पूर्णवाद' अमृतमहोत्सवात वेदांचा गजर

## ■ २४ ते २८ एप्रिलदरम्यान वेद पारायण
## ■ मंत्रजागर आणि धार्मिक विधींची मेजवानी
## ■ अध्यात्म, संस्कार आणि परंपरेचा त्रिवेणी संगम

**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर येथे 'पूर्णवाद अमृत महोत्सव २०२६' निमित्त आयोजित श्री दत्तमूर्ती स्थापना उत्सव, गुरु-शिष्य मेळावा तसेच ऋग्वेद संहिता स्वाहाकार व वेद पारायणाचा सोहळा २४ ते २८ एप्रिलदरम्यान पार पडत असून, परिसरात भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

### संस्कारांची शिकवण

*गुरु-शिष्य मेळाव्याच्या माध्यमातून पारंपरिक ज्ञानपरंपरेचे जतन, गुरुंचे महत्त्व आणि शिष्यांनी आचरणात आणावयाचे संस्कार यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच श्री दत्तमूर्ती स्थापना उत्सवामुळे श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक उर्जा यांचे केंद्र निर्माण झाले आहे.*

### मंत्रजागर ते संहिता वाचन

*दररोज सकाळी ७ ते ९ या वेळेत मंत्रजागर व अध्यात्म सेवा, तर सकाळी ९ ते १२ या वेळेत संहिता वाचन (वेद पारायण) असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर सकारात्मक ऊर्जेने भरून निघत असून, भाविकांना दिवसभर आध्यात्मिक अनुभूती मिळत आहे.*



### उत्स्फूर्त प्रतिसाद

*परंपरा, संस्कार आणि अध्यात्म यांचा संगम घडवणाऱ्या या महोत्सवाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जीवन ही कला आहे आणि नीती म्हणजे माणूस या उदात्त विचारांचा प्रसार करत हा सोहळा साजरा केला जात असून, समाजात सकारात्मक मूल्यांची रुजवात करण्याचा प्रयत्न आयोजकांकडून केला जात आहे.*

### वेद पारायणातून ज्ञानाचा प्रसार

*वेद पारायणाच्या माध्यमातून वेदांतील तत्त्वज्ञान, जीवनमूल्ये आणि निसर्गाशी समतोल साधण्याचे विचार मांडले जात आहेत. सातत्यपूर्ण आणि नियमबद्ध पठणामुळे केवळ धार्मिक वातावरणच नव्हे, तर तरुण पिढीला भारतीय संस्कृतीची सखोल ओळख मिळत आहे. वेद हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवनशैलीचा मार्गदर्शक असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित केले जात आहे.*

### अनुभवी वेदमूर्तींचे मार्गदर्शन

*या संपूर्ण विधीचे मार्गदर्शन पूर्णवाद परिवाराचे कुलपुरोहित व वेदमूर्ती प्रकाश शास्त्री दंडगे गुरुजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून केले जात आहे. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली सर्व विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडत असून भाविकांना प्रत्यक्ष सहभाग घेण्याची संधी मिळत आहे.*

### स्वाहाकाराचे विशेष महत्त्व

*या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे 'ऋग्वेद संहिता स्वाहाकार' हा दुर्मिळ आणि पुण्यदायी धार्मिक विधी. ऋग्वेदातील सूक्तांचे शास्त्रोक्त उच्चारण करत यज्ञकुंडात आहुती अर्पण करण्याची ही प्रक्रिया असल्याने वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे वेदशास्त्रात सांगितले जाते. स्वर, छंद आणि उच्चारांच्या शुद्धतेसह सादर होणाऱ्या या मंत्रोच्चारांमुळे मानसिक शांती आणि आध्यात्मिक समाधान लाभत असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.*

### सुयोग्य आयोजन

*महोत्सवासाठी स्वच्छता, निवास, प्रसाद व्यवस्था आणि भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे दूरवरून येणाऱ्या भाविकांना सोयीस्कर वातावरण मिळत आहे. एकूणच, 'पूर्णवाद अमृत महोत्सव २०२६' अंतर्गत पार पडणारा हा सोहळा केवळ धार्मिक विधी न राहता, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्य यांचा प्रभावी संगम ठरत असून, पारनेरात अध्यात्मिक उर्जेचा नवा उत्सव निर्माण करत आहे.*

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# संकरित गाईंची दूध उत्पादन वाढीची सूत्रे

**सद्यःस्थितीतील संकरित गाईंची दुसऱ्या- तिसऱ्या पिढीनंतर दूध उत्पादकता कमी होत आहे. तसेच रोगप्रतिकारक क्षमता कमी होऊन त्या लवकर आजारी पडतात. हे लक्षात घेऊन संकरित गाईंच्या व्यवस्थापनात बदल करणे आवश्यक आहे. दूध उत्पादन वाढीमध्ये संकरित गाईंचा प्रमुख वाटा आहे. देशाच्या एकूण दूध उत्पादनातील सुमारे २७ टक्के इतके दूध हे संकरित व पूर्ण विदेशी गाईंपासून तयार होते. देशातील देशी गाईची प्रतिदिन प्रतिगाय दूध उत्पादकता ३.७३ किलो आणि गावठी गाईंची २.४१ किलो आहे. याउलट विदेशी गाईंची प्रतिदिन प्रतिगाय दूध उत्पादकता ११.४८ किलो आणि संकरित गाईची ७.६१ किलो आहे. संकरित गाईंच्या प्रजनन क्षमतेत सुधारणा झाली. यामध्ये प्रथमतः विण्याचे वय, भाकड काळ, दोन वितांमधील अंतर लक्षणीयरित्या कमी झाले.**



उत्पादकता वाढल्यामुळे देशी गाईंच्या तुलनेत प्रति लिटर दूध उत्पादनावरील खर्च कमी झाला. संकरीकरणाच्या सुरुवातीच्या अडीच दशकांमध्ये हे फायदे प्रामुख्याने दिसून आले; परंतु गेल्या दशकापासून यामधील उणिवा आणि त्याचा एकूण दूध उत्पादकतेवर होणारा विपरित परिणाम लक्षात येत आहे. सद्यःस्थितीतील संकरित गाईमध्ये दुसऱ्या-तिसऱ्या पिढीनंतर दूध उत्पादकता कमी होत आहे. या गाईची रोगप्रतिकारक क्षमता कमी होऊन त्या जिवाणू व विषाणूजन्य आजारास लवकर बळी पडतात. उदा. कासदाह, लाळ्या खुरकूत, गोचिड ताप इत्यादी. याशिवाय त्यांची उष्ण हवामानात तग धरून राहण्याची क्षमता उल्लेखनीयरित्या कमी झाली आहे. वाढत्या खाद्य किमती, व्यवस्थापन खर्च आणि अनिश्चित दूध दरामुळे पशुपालकांच्यासमोर आर्थिक अडचणी आहे. हे सुधारण्यासाठी व्यवस्थापनामध्ये बदल आवश्यक आहेत.

- मुळात संकरीकरण धोरण हे चुकीचे नव्हते; परंतु हे धोरण राबविताना सुसूत्रीकरणाचा अभाव व प्रत्यक्ष संकरीकरण करताना पशुपालक आणि तज्ज्ञांद्वारे जाणते - अजाणतेपणे झालेल्या चुकांचा परिणाम दूध उत्पादकता कमी होण्यावर झाला. यातील प्रमुख कारण म्हणजे स्वैर संकरीकरण.
- आपल्याकडील गाईचे अनुवांशिक गुणधर्म विचारात न घेता वेगवेगळ्या पिढींमध्ये वेगवेगळ्या जातींचा (होल्स्टिन फ्रिझीयन/ जर्सी) आणि अनुवांशिक गुणधर्म (टक्केवारी) असलेल्या वळूचा वापर, जास्त विदेशी जातीची टक्केवारी म्हणजे जास्त दूध हा गैरसमज. या सर्वांमुळे संकरित गाईमध्ये अपेक्षित विदेशी गाईचे गुणधर्म राखता आले नाहीत. उच्चतम क्षमता असलेल्या सिद्ध वळूंची कमतरता, योग्य व्यवस्थापनाचा अभाव हे घटकसुद्धा उत्पादकता कमी होण्यास कारणीभूत ठरले.

## आनुवंशिक सुधारणा

- भारत दूध उत्पादनामध्ये जगात प्रथम क्रमांकावर असला, तरी आपल्या गाईंची दूध उत्पादकता (८ ते ११ कि.ग्रॅ.) ही प्रगत राष्ट्रांतील गाईंच्या तुलनेत (३० ते ३५ कि.ग्रॅ.) खूपच कमी आहे. उच्च आनुवांशिक गुणधर्म असलेले वळू व गाई, योग्य पशुपैदास धोरण व सुयोग्य व्यवस्थापन या त्रिसूत्रीचा वापर करून आनुवांशिक सुधारणा शक्य आहे. यामध्ये पशुपालकाची भूमिका महत्त्वाची आहे.
- पशुपालकांनी आपल्या कळपातून सर्वाधिक दूध देणाऱ्या, वर्षातून एकदा विणाऱ्या, रोगास कमी बळी पडणाऱ्या जातिवंत गाईंची निवड पैदाशीसाठी करावी. ही निवड करण्यासाठी गाईंच्या उत्पादन व प्रजननासंबंधीच्या अद्ययावत नोंदी असणे महत्त्वाचे असते.
- संकरित गाईंचे आनुवांशिक गुणधर्म (देशी व विदेशी जातींची टक्केवारी) माहिती असेल तर योग्य वळूच्या रेतमात्रांचा वापर करता येतो.
- प्रत्येक गाईचे दूध उत्पादन, वंशावळ (आई-वडिलांची उत्पादनक्षमता), प्रजनन, आरोग्य व दैनंदिन व्यवस्थापन संबंधित अद्ययावत नोंदी ठेवाव्यात. दुधातील घटक (फॅट, एस.एन.एफ.) यांच्याही नोंदी ठेवाव्यात. या नोंदींच्या आधारेच उत्कृष्ट जनावरांची निवड व अनुवंश सुधारणा करणे शक्य होते.
- पंजाबमधील पशुपालकांनी संघटित प्रयत्न आणि योग्य पैदास धोरण राबवून उच्च दूध उत्पादन क्षमतेच्या संकरित गाई गोठ्यात विकसित केल्या आहेत. हे आपल्यालाही शक्य आहे.

## या करा उपाययोजना...

- संकरित गाईंची उत्पादकता वाढविणे आणि पुढील पिढीत अनुवांशिक सुधार करून उत्पादकता वाढविण्यावर भर देणे गरजेचे आहे.
- सद्यःस्थितीतील संकरित गाईंचे अनुवांशिक गुणधर्म निश्चित झाले असल्यामुळे त्यामध्ये बदल करता येत नाही. या गाईंचे दूध उत्पादन योग्य व्यवस्थापन करून वाढविता येऊ शकते.
- संकरित गाईंच्या अनुवांशिक क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी त्यांना दूध उत्पादन क्षमतेनुसार चारा व खाद्य द्यावे. अशा गाईस उच्च पोषणमूल्य असलेला एकदलवर्गीय (मका, ज्वारी, ओट इत्यादी) आणि द्विदलवर्गीय (ल्युसर्न, बरसीम इत्यादी) हिरवा चारा वर्षभर देणे आवश्यक असते. याचबरोबर सुका चारा व प्रथिनयुक्त खुराक, खाद्य त्यांच्या दूध उत्पादन क्षमतेनुसार (४०० ग्रॅम/ लिटर) द्यावे.
- आरोग्य व्यवस्थापन (उदा. लसीकरण, प्रथमोपचार व विलगीकरण), गोठा व्यवस्थापन (मुक्त पद्धतीचा गोठा) आणि बारकाईने इतर दैनंदिन व्यवस्थापन केल्यास या गाईंची उत्पादकता वाढू शकते.


## पैदास वळूची निवड

पुढील पिढीतील अनुवंश सुधारणेसाठी योग्य व उत्कृष्ट वळूची निवड हा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रजननासाठी केवळ उच्चतम उत्पादकता असलेल्या सिद्ध वळूच्या (प्रोजेनी टेस्टेड) रेतमात्रा वापराव्यात. अनुवांशिक गुणधर्म पुढील पिढीत प्रसारित करण्याची क्षमता व अचूकता ही इतर कोणत्याही पद्धतीने निवडलेल्या वळूपेक्षा सिद्ध वळूमध्ये जास्त असते. सद्यःस्थितीत भारतात सिद्ध वळूंची संख्या मर्यादित आहे; परंतु आता परदेशातून आयात केलेले उच्चतम उत्पादकता असलेल्या वळूंच्या रेतमात्रा उपलब्ध आहेत. निवडलेल्या उच्च उत्पादन क्षमता असलेल्या वळूच्या रेतमात्रा जातीवंत दुधाळ गाईसाठी वापराव्यात. यामध्ये एकच समस्या होऊ शकते ती म्हणजे या वळूंचे अनुवांशिक गुणधर्म व उत्पादनक्षमता पुढील पिढीमध्ये पूर्णपणे जातील हे खात्रीशीररीत्या सांगता येत नाही. याचे कारण म्हणजे या वळूंची सिद्धता ही परदेशी वातावरणात तपासलेली असते. आपल्याकडील स्थानिक वातावरण पूर्णपणे वेगळे आहे. यासाठी शक्य असल्यास स्थानिक वातावरणात निवड केलेल्या सिद्ध वळूच्या रेतमात्रेला प्राधान्य द्यावे.


## विदेशी गाईच्या अनुवांशिकतेचे प्रमाण

- विविध अभ्यासांतर्गत असे आढळून आले आहे, की ५० ते ६२.५० टक्के विदेशी गाईंचे (एच.एफ./ जर्सी) गुणधर्म असलेल्या संकरित गाईंची उत्पादकता उत्कृष्ट असते. म्हणूनच शासनानेसुद्धा आपल्या पशुपैदास धोरणात विदेशी गाईंचे एवढेच प्रमाण ठेवावे, असे सुचविले आहे.
- बागायती भागात एच.एफ. आणि दुष्काळी व डोंगराळ भागात जर्सी जातीचा संकरीकरणासाठी वापर करावा, असे सुचविले आहे.
- साधारणपणे ७५ टक्के व त्यावरील विदेशी संकरित जनावरांची उत्पादनक्षमता ही कमी होत असल्यामुळे सामान्य पशुपालकांनी वरील ठरवून दिलेल्याच मर्यादा पाळाव्यात.
- काही प्रगतशील शेतकरी १०० टक्के होल्स्टिन फ्रिझीयन जातीची गाय पाळतात. या गाईस अत्यंत उत्कृष्ट व्यवस्थापन पुरविणे गरजेचे आहे. जेणेकरून तिच्या उत्पादनक्षमतेचा पुरेसा वापर होईल. नाही तर नुकसानच होण्याची शक्यता जास्त असते.

## सेक्स सॉर्टेड रेतमात्रेचा वापर




सेक्स सॉर्टेड रेतमात्रेचा वापर



गोठ्यात जन्माला येणारे वासरू हे कालवड (मादी) असावे ही शेतकऱ्यांची इच्छा असते. आधुनिक तंत्राद्वारे केवळ मादी वासरू होण्याची क्षमता असलेल्या शुक्राणूयुक्त रेतमात्रा उपलब्ध आहेत. सध्या या रेतमात्रेची किंमत जास्त वाटेल परंतु अनावश्यक जन्माला आलेल्या नर वासराच्या संगोपनापेक्षा हा खर्च नगण्य आहे. हे तंत्रज्ञान निश्चितच भारतातील दुग्धव्यवसायाची दिशा बदलण्यास उपयुक्त ठरणारे आहे. प्रजननासंबंधीच्या समस्या कमी करण्यासाठी एकत्रित माज नियंत्रण आणि शक्य असल्यास भ्रूण प्रत्यारोपण पद्धतीचा अवलंब करून गोठ्यातील गाईची उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न करावा.


# नाचणी धान्यावरील प्रक्रिया पद्धती, मूल्यवर्धन

**भरडधान्य पिकांमध्ये प्राथमिक आणि दुय्यम प्रक्रियेमध्ये कच्च्या धान्यांचे खाद्य आणि विक्रीयोग्य उत्पादनांमध्ये रूपांतर करण्यासाठी अनेक क्रियाकलापांचा समावेश होतो. नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना हे पोषणाचे महत्त्वाचे स्त्रोत आहेत. आपल्या राज्यात पारंपरिक पद्धतीने लागवड केल्या जाणाऱ्या भरडधान्य पिकांमध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना या तृणधान्य पिकांचा समावेश होतो. यामध्ये धान्याच्या मूलभूत रचनेनुसार त्यावर प्रक्रिया करणे गरजेचे असते. नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना या तृणधान्य पिकांचे आवरण दाण्याभोवती घट चिकटून असते. त्यामुळे इतर म्हणजे गहू, ज्वारी व बाजरी या धान्याप्रमाणे मळणी करताना हे आवरण सहज बाजूला होत नाही. नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना या तृणधान्य पिकांच्या आवरणामध्ये मोठ्या प्रमाणात तंतूमय पदार्थ असतात. मानवी शरीरात या टणक आवरणाचे पचन होत नाही. परंतु या सर्व तृणधान्य पिकांचे पौष्टिक महत्व लक्षात घेता या धान्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे.**



## विविध प्राथमिक आणि दुय्यम प्रक्रियेचे माहिती

### ■ प्राथमिक प्रक्रिया



प्राथमिक प्रक्रिया करणाऱ्या यंत्रांमध्ये सामान्यतः दाणे स्वच्छ करणे, डिहॉल करणे आणि काहीवेळा त्यांना वापरण्यासाठी योग्य बनवण्यासाठी पॉलिश करणे समाविष्ट असते. वापरण्यात येणारी विशिष्ट यंत्रे धान्याच्या प्रकारावर आणि उत्पादनाच्या प्रमाणावर अवलंबून बदलू शकतात.

- स्वच्छता : पहिली पायरी म्हणजे दाण्यांमधून दगड, घाण, मोडतोड आणि इतर परदेशी पदार्थ यांसारखी अशुद्धता काढून टाकणे. हे सामान्यतः चाळणी किंवा पडदे वापरून केले जाते.
- डिहस्किंग : नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना यासारख्या धान्याच्या बाबतीत, बाहेरील भुसी काढून टाकणे आवश्यक आहे. डिहस्किंग मॅन्युअली किंवा हलर्स सारखी मशीन वापरून करता येते.
- प्रतवारी आणि वर्गीकरणः डिहस्किंग केल्यानंतर, धान्यांची अनेकदा आकार, आकार आणि गुणवत्तेनुसार वर्गवारी केली जाते. ही पायरी अंतिम उत्पादनात एकसमानता सुनिश्चित करण्यात मदत करते.
- दळणे : काही धान्य पीठ तयार करण्यासाठी दळणातून जाऊ शकतात. इच्छित अंतिम उत्पादनावर अवलंबून मिलिंगची व्याप्ती बदलू शकते. खडबडीत किंवा बारीक दळणे केले जाऊ शकते.

### ■ दुय्यम प्रक्रिया

- भाजणे : लहान बाजरीसाठी भाजणे ही एक सामान्य दुय्यम प्रक्रिया पद्धत आहे. हे चव, सुगंध आणि शेल्फ लाइफ वाढवते. भाजलेले बाजरी जसे आहे, तसे खाल्ले जाऊ शकते किंवा विविध पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाऊ शकते.
- मिलिंग आणि ग्राइंडिंग : जर प्राथमिक प्रक्रियेमध्ये दळणे समाविष्ट नसेल, तर दुय्यम प्रक्रियेमध्ये धान्याचे पीठ तयार करण्यासाठी दळणे किंवा दळणे समाविष्ट असू शकते. या पिठाचा वापर लापशी, रोटी आणि केकसह विविध पदार्थ बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.
- पॉपिंगः राळा धान्यामध्ये फुगवलेले धान्य तयार करण्यासाठी पॉप केले जाऊ शकतात, ज्याचा वापर स्नॅक्स आणि न्याहारी धान्यांमध्ये केला जातो.
- आंबवणेः आंबवलेला बाजरी लापशी किंवा इडली (पारंपारिक भारतीय डिश) सारखी उत्पादने तयार करण्यासाठी किण्वनाचा वापर केला जाऊ शकतो.
- फ्लेक उत्पादनः न्याहारी तृणधान्ये आणि स्नॅक्समध्ये वापरण्यासाठी फ्लेक्ड बाजरी तयार केली जाते. रोलर्समध्ये दाणे दाबून फ्लेकिंग केले जाते.
- पॅकेजिंग आणि स्टोरेजः प्रक्रिया केलेल्या धान्य उत्पादनांची गुणवत्ता आणि शेल्फ लाइफ राखण्यासाठी योग्य पॅकेजिंग आणि स्टोरेज महत्त्वपूर्ण आहे. ओलावा, कीटक आणि दूषित होण्यापासून त्यांचे संरक्षण करणे महत्वाचे आहे.

### धान्यावर प्रक्रिया का आवश्यक आहे?

भुसा असलेले भरडधान्य पिके (नाचणी, वरई, राळा, बर्टी, कोडो आणि चीना) मानवी वापरासाठी योग्य बनवण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्याची सुरुवात साफसफाई, प्रतवारी आणि भुसे काढण्यापासून होते.

### विचारात घेण्यासारखे मुद्दे

प्रकल्प हाती घेण्यापूर्वी बाजारातील संभाव्यतेचे सर्वेक्षण आणि संशोधन करावे. काही यशस्वी उपक्रमांना भेट द्यावी आणि सुरुवातीच्या टप्प्यात आलेल्या अडचणींचा अभ्यास करावा. कामगिरी तपासल्यानंतरच मशीन खरेदी करावे. नवीन उद्योजकांनी प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षण घ्यावे. चाळणीचा आकार आणि नाचणी दाण्यांचा आकार अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे.



■ आपल्या आहारात नाचणी समाविष्ट करणे विविध मार्गांनी केले जाऊ शकते, जसे की दलिया, रोटी (फ्लॅटब्रेड), डोसा (पॅनकेक) आणि भाजलेल्या वस्तूंमध्ये वापरणे. ग्लूटेन-मुक्त आणि पोषक-समृद्ध पर्याय अन्नासाठी नाचणीचे पौष्टिक आणि आरोग्य फायदे हे संतुलित आहारासाठी एक मौल्यवान जोड बनवतात. नित्य सेवन करणाऱ्या लोकांमध्ये हृदयरोग, आतड्यांवरील व्रण आणि मधुमेहाचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे. नाचणीपासून भाकरी, माल्ट, नुडल्स, पापड, आंबील, इडली, बिस्किटे यासारखे अनेक प्रकारचे मूल्यवर्धित खाद्यपदार्थ तयार करता येतात. तसेच गर्भवती माता व लहान मुलांच्या खाद्यामध्ये नाचणी सत्वाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.

# कोंबड्यांमध्ये आढळणारे विषाणूजन्य आजार

**कुक्कुटपालकास विषाणूजन्य आजारांवर उपचार करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते. त्यामुळे प्रामुख्याने रोगप्रतिबंधात्मक उपाययोजनाच फायदेशीर ठरतात. विषाणूजन्य आजाराचा प्रसार झपाट्याने होतो. त्यामुळे बाधित पक्षी दुसऱ्याच दिवशी रोगांची लक्षणे दाखविण्यास सुरुवात करून दगावतात. बहुतांशी विषाणूजन्य आजारांची लक्षणे ही एकमेकांशी मिळतीजुळती असतात, त्यामुळे बाह्य लक्षणांवरून रोगनिदान करणे अवघड असते.**

रोग निदान झाले तरी त्यावरील उपचाराचा खर्च अधिक असतो. योग्य उपचारांती आजारातून बरे झालेल्या पक्ष्यांची अंडी आणि मांस उत्पादनक्षमता पूर्ववत होण्यास बराचसा कालावधी लागतो. त्यामुळे योग्य व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून आजाराचा धोका कमी करणे गरजेचे असते. कोंबड्यांमध्ये आढळणाऱ्या मुख्य विषाणूजन्य आजारांबाबत माहिती घेऊयात.

## मानमोडी

**लक्षणे काय...**

- पक्षी शिंकतात, धापा टाकतात.
- चोच उघडून श्वास घेतात.
- पाय व मानेतील स्नायूंच्या समन्वयात अभाव.
- एक किंवा दोन्ही पायांना पक्षाघात.
- पक्षी मान गोलाकार, वर आणि खाली फिरवतात.
- काही पक्षी मान वरती फिरवून उलटे चालतात.
- प्रौढ पक्ष्यांच्या घशात घरघर आवाज येतो.
- भूक मंदावते.
- कवचहीन अंडी घालणे अथवा अंडी देण्याची क्रिया बंद होते.
- हगवण लागते.

**उपाय काय...**

- आजारी पक्षी निरोगी पक्ष्यांपासून वेगळे करावेत.
- कुक्कुटगृहातील सर्व भांडी, साहित्य, कुक्कुटगृह जंतुनाशकद्रव्ये वापरून स्वच्छ ठेवणे.
- वेळोवेळी लसीकरण करणे.


## मॅरेक्स

**लक्षणे काय...**

- पंखांचा व पायांचा पक्षाघात.
- दृष्टिदोष निर्माण होणे, डोळ्यांच्या बाहुल्यांची असाधारण उघडझाप करणे, बुबुळ अपारदर्शक होऊन शेवटी अंधत्व येते.
- पिसांच्या मुळांना सूज येते.

**उपाय काय...**

- वेळच्या वेळी लसीकरण करणे.
- जंतुनाशकद्रव्यांचा उपयोग करून कुक्कुटगृह आणि वापरातील भांडी स्वच्छ ठेवणे.



## गंबोरो

**लक्षणे काय...**

- पाण्यासारखी पांढरी हगवण, भूक न लागणे.
- पिसे राठ होतात. पक्ष्यांची वाढ खुंटते.
- पक्षी डोळे बंद करतात
- काही पक्ष्यांच्या छातीवर, एक किंवा दोन्ही पायांवर रक्ततप्रवाह साकाळल्या प्रमाणे दिसते.

**उपाय काय...**

- शेडची स्वच्छता, निर्जंतुकीकरण.
- मांसल पक्षी, अंड्यावरील पक्षी स्वतंत्र वाढविणे.
- रोगप्रतिबंधक लसीकरण करणे.

## शॉर्ट न्यूज

### भोकरमध्ये घराला भीषण आग

■ श्रीरामपूर : तालुक्यातील भोकर शिवारातील विधाटे वस्ती येथे एका घराला आग लागल्याने संसारोपयोगी साहित्य आणि मंडप डेकोरेशनचे साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत कुटुंबाचे सुमारे साडेतीन लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घरात झोपलेले बापूसाहेब विधाटे हे नातीने दिलेल्या आवाजामुळे सुखरूप बाहेर पडले. उन्हामुळे घरातून काहीही बाहेर काढता आले नाही.

### पाथर्डीत सलग दोन अपघात

■ पाथर्डी : तालुक्यात दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये एका २२ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पाथर्डी-बीड राज्य महामार्गावर मोहटे शिवारातील खाडीचे लवान येथे झालेल्या अपघातात जेसीबी ऑपरेटर रोहित बाबासाहेब सोनटक्के (वय २२, रा. वरूर, ता. शेवगाव) याचा भरधाव ट्रकने धडक दिल्याने जागीच मृत्यू झाला. कुत्तरवाडी येथे काम आटोपून तो दुचाकीवरून घरी परतत असताना हा अपघात घडला.

### भंडारदरा धरणात मृतदेह आढळला

■ भंडारदरा धरणामध्ये दुपारी तीन वाजेच्या सुमारास मुरशेत येथील दिलीप बांगर (वय ४५ वर्षे) यांचा मृतदेह आढळून आला. शेंडी येथे फिरताना ते बेपत्ता झाले होते. राजुर पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला असून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### सावेडीत हुक्का पार्लरवर छापा

■ सावेडी : उपनगरातील सोनानगर चौक, बारस्कर मळा येथे अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर अहिल्यानगर शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकाने धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पिण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि तंबाखूजन्य पदार्थ असा चार हजार २०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खाजगी हॉस्पिटलमध्ये नर्सची आत्महत्या

■ जामखेड : शहरातील बसस्थानक परिसरातील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये शबनम दस्तगीर सय्यद (वय २९) या नर्सने बाथरूममध्ये आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र घटनास्थळी इंजेक्शनची सुई आढळून आली आहे. नर्सच्या वडिलांनी दिलेल्या माहितीवरून जामखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# नेते समाज आणि देशाला विसरून पैशाच्या मागे लागले

## अण्णा हजारेंची संतप्त प्रतिक्रिया; राघव चढ्ढांसह ७ खासदारांचा भाजपमध्ये प्रवेश

**राळेगण सिद्धी : प्रतिनिधी**

देशाच्या राजकारणात एका मोठ्या राजकीय भूकंपाची नोंद झाली असून, 'आम आदमी पक्षा'चे खासदार राघव चढ्ढा यांनी इतर ७ खासदारांसह अनपेक्षितपणे भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या प्रवेशापूर्वी राघव चढ्ढा यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यसभेतील 'आप'च्या गटाचे भाजपमध्ये विलीनीकरण करत असल्याचे अधिकृतपणे जाहीर केले, ज्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या धक्कादायक फुटीवर पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी प्रतिक्रिया दिली असतानाच, ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी देखील या घटनेचा कडक शब्दांत निषेध केला आहे.

अण्णा हजारे म्हणाले, पक्ष टिकवण्यासाठी, एकत्र राहण्यासाठी संसदेत कायदा होणे गरजेचे आहे. आपल्या मर्जीप्रमाणे कोणीही पक्ष बदलणार नाही.

सत्ता आणि पैसा यांच्या लालचमध्ये येताच इकडून तिकडे आणि तिकडून इकडे पक्षांतर होते. त्यामुळे, मनमर्जीप्रमाणे सत्ताबलदाचे काम होतात हे बरोबर नाही, असे म्हणत हजारे यांनी यावर संताप व्यक्त केला आहे.



पुढे बोलताना अण्णा हजारे म्हणाले, आंदोलनातून आम आदमी पक्षाचा उदय झाला, पण आता पक्ष फुटत आहे. स्वार्थ आल्यानंतर लोक सोडून जातात, समाज आणि देश डोळ्यासमोर ठेऊन काम केल्यास कोणीही जाणार नाही. आज समाज आणि देशाला विसरून नेते सत्ता आणि पैशाच्या पाठीमागे लागत आहेत. म्हणून लोकांनी निवडून देताना चारित्र्यशील लोक निवडून दिले पाहिजे. हे जे चालले आहे ते स्वार्थासाठी चालले आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता, आज समाज आणि देश डोळ्यासमोर राहिलेला नाही.

दरम्यान, राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी 'आम आदमी पक्षा'चा अधिकृत राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला असून, त्यांच्यासोबत पक्षांतर करणाऱ्या इतर सात जणांची नावेही त्यांनी जाहीर केली आहेत.

यामध्ये सर्वात धक्कादायक नाव म्हणजे अशोक मित्तल यांचे असून, चड्ढा यांच्या हकालपट्टीनंतर अवघ्या १५ दिवसांपूर्वीच त्यांची राज्यसभेच्या उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली होती.

विशेष म्हणजे, अवघ्या १० दिवसांपूर्वीच मित्तल यांच्यावर अंमलबजावणी संचालनालयाने छापेमारी केली होती, त्यानंतर आता त्यांनी थेट भाजपची वाट धरल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

# हरिगावातील आकारी पडीत जमिनीचा प्रश्न मार्गी

## मुळ वारसांना मिळणार ताबा; मंत्री बावनकुळे यांची ग्वाही; ६ मे रोजी मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

श्रीरामपूर शेती महामंडळाच्या हरिगाव मळ्यातील आकारी पडीत जमिनी मूळ वारसांना सिलिंग क्टप्रमाणे मोजणी करून परत केल्या जातील, अशी महत्त्वाची ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्रालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा सकारात्मक निर्णय घेण्यात आला. प्रशासकीय स्तरावर मार्ग निघाल्याने शेतकरी संघटनेने १ मे रोजी होणारे 'कब्जा आंदोलन' स्थगित केले आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या प्रयत्नाने मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. यात मंत्री विखे पाटील,शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे, याचिकाकर्ते गिरीधर आसने शेती महामंडळ कार्यकारी संचालक यांनी सहभाग घेतला.



या बैठकीस भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, याचिकाकर्ते गिरीधर आसने,माजी सभापती दीपक पटारे, बाजार समिती माजी सभापती नानासाहेब शिंदे,डॉ शंकर मुठे,भिमभाऊ बांद्रे,पत्रकार भाऊसाहेब काळे, सरपंच सागर मुठे आदी उपस्थित होते.

या बैठकीत महसूलमंत्र्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या निकालानंतर मंत्रिमंडळाने यापूर्वीच मंजुरी दिली होती, मात्र राज्यपालांच्या स्वाक्षरीअभावी हा प्रश्न प्रलंबित राहिला. आता शेती महामंडळाच्या एमडींना जमिनीचे गटवार ले-आऊट नकाशे तयार करण्याचे आदेश दिले आहेत. हे नकाशे तयार झाल्यावर ६ मे रोजी मुख्यमंत्री महोदयांसमोर सुधारित प्रस्ताव सादर केला जाईल, त्यानंतर ताबा देण्याची अडचण दूर होईल. पालकमंत्री विखे पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडताना जमिनीचे तुकडे होण्यापेक्षा सर्वांना 'एकाच बाजूला' मोजणी करून ताबा देण्याचा प्रस्ताव मांडला, त्यास शेतकऱ्यांनी संमती दर्शवली. सिलिंग क्टनुसार वारसांना जमीन दिल्यानंतर उर्वरित जमीन महामंडळ उद्योगांसाठी वापरू शकणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत आकारी पडीत शेतकऱ्यांची बैठक झाली खातेदारांची संख्या तीन पटीने वाढली १९१८ साली ९ गावांतील ५७६ मूळ खातेदार होते, आज ही संख्या तीन पटीने वाढली आहे. महसूलमंत्र्यांच्या आश्वासनामुळे आम्ही १ मेचे आंदोलन स्थगित करत आहोत, अशी माहिती शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिली.

वाचकांच्या लेखणीतून

# पुस्तकातले मस्तकात जाऊ द्यावे



२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला गेला. पुस्तक, पुस्तकवाचन, पुस्तकांचे कॉपीराईट यांसंबंधी जागृती होण्यासाठी किंवा पुस्तक संस्कृतीविषयी समाजात जागृती व्हावी म्हणून हा दिवस जगभर साजरा केला जातो. पुस्तक प्रदर्शने, पुस्तक भेटींचा कार्यक्रम, पुस्तकांच्या कॉपी राईट संबंधी चर्चासत्रे, ग्रंथपुरस्कार, प्रकाशन संस्थांचा सन्मान, लेखक/कवी आपल्या भेटीला असे पुस्तकासंबंधी विविध कार्यक्रम जगभर साजरे झाले.

मध्यंतरी जास्त खपाच्या पुस्तकांच्या नकली प्रती (पायरेटेड बुक्स) बाजारात आल्या होत्या. हे सरळ सरळ कॉपी राईट कायद्याचे उल्लंघन होते आणि आहे.

आपल्या संस्कृतीत पुस्तकाविषयी फार पवित्र भावना आढळते. संस्कृत भाषेत एक श्लोक आहे-

तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत् रक्षेत् शिथिल बंधनात्।
मूर्खहस्ते न दातव्यं एवं वदति पुस्तकम्।।

पुस्तक म्हणते, माझे तेलापासून रक्षण करा (अन्यथा पुस्तकावर तेलाचे डाग पडतील). पाण्यापासून माझे रक्षण करा (नाही तर त्याचा पाण्याने भिजून लगदा होईल). माझी बांधणी सैल होऊ देऊ नका (त्यामुळे पुस्तकाची पाने विखुरली जातील. मला मूर्खाच्या हाती सोपवू नका.

हल्ली दूरदर्शन आणि मोबाईलच्या अती वापरामुळे आणि अवास्तव प्रस्थामुळे पुस्तकवाचनावर फार अनिष्ट परिणाम झालेले आहेत. ग्रामीण भागात पूर्वी घरोघर धार्मिक ग्रंथ वाचनाची परंपरा होती. ती आता इतिहासात जमा झाल्या अखेर आहे. धार्मिक, सांस्कृतिक वा वाचनश्रवणाचे संस्कार यांकडे दुर्लक्ष झाले आहे. आधुनिक पिढी जी भाषा बोलते त्यात लिंगभेद, शब्दप्रयोग तथा म्हणींचा चुकीचा उच्चार आणि चुकीचा अर्थ लावला जातो. (उदा. नाकी नऊ येणे ऐवजी नाकातून नऊ येणे, पिवळा कपडा ऐवजी पिवळावाला कपडा) हे दोष दूर करण्यासाठी पुस्तक वाचनासारखा रामबाण उपाय नाही. म्हणून पुस्तकातले मस्तकात जाऊ द्यावे, हे उत्तम.



**नाना ढवळे,**
८२८६९१३२२३, निघोज,
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.

# कांदा पिकासाठी 'शाश्वत' उपायांचा शोध

## राणी शेख यांना पीएचडी बहाल; शेतकऱ्यांच्या समस्येला संशोधनातून उत्तर

**पारनेर : प्रतिनिधी**

कांदा हे महाराष्ट्रातील प्रमुख नगदी पीक असले तरी बुरशीजन्य रोगांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागते. या गंभीर समस्येवर पर्यावरणपूरक आणि शाश्वत उपाय शोधण्याचा यशस्वी प्रयत्न पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या संशोधक विद्यार्थिनी डॉ. राणी शेख यांनी केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय संशोधनाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून त्यांना पीएचडी (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

### नैसर्गिक उपायांवर भर

डॉ. शेख यांनी 'कांदा पिकावरील विविध बुरशीजन्य रोग व त्यांचे नियंत्रण' हा विषय निवडून संशोधन केले. रासायनिक कीटकनाशकांच्या दुष्परिणामांमुळे जमिनीची गुणवत्ता खालावत असल्याने त्यांनी नैसर्गिक घटकांचा वापर करण्यावर भर दिला. वनस्पतींच्या पानांचा अर्क, गायीचे गोमूत्र आणि ताक यांच्या साहाय्याने प्रयोगशाळेत बुरशीजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.



### शाश्वत शेतीसाठी नवा मार्ग

डॉ. शेख यांचे संशोधन भविष्यात विषमुक्त आणि शाश्वत शेतीसाठी दिशादर्शक ठरणार आहे. सेंद्रिय आणि कमी खर्चिक उपायांमुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मोठा दिलासा मिळू शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### संशोधनासाठी सहकार्य

हे संशोधन पूर्ण करताना महात्मा फुले कृषी विद्यापीठ तसेच कांदा व लसूण संशोधन केंद्र, राजगुरुनगर यांचे मोलाचे तांत्रिक सहकार्य लाभले. विशेष म्हणजे, हे संशोधन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्येही प्रसिद्ध झाले आहे.

### शैक्षणिक क्षेत्रातही ठसा

डॉ. राणी शेख यांनी यापूर्वी वनस्पतीशास्त्र विषयातून सेट आणि गेट सारख्या कठीण परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात ठोस ओळख निर्माण केली आहे.

### सर्व स्तरांतून अभिनंदन

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच शेतकरी वर्गातूनही त्यांच्या संशोधनाबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत असून, हे संशोधन प्रत्यक्ष शेतीत उपयोगी पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण

कांदा उत्पादकांसाठी बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी हा 'शाश्वत' मार्ग आशेचा किरण ठरत असून, भविष्यात शेती अधिक सुरक्षित आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# पुण्यात गोळीबाराचा थरार!

## वारजेतील सलूनमध्ये घुसून अंदाधुंद गोळीबार, दोन जण जखमी; परिसरात खळबळ

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतानाच शुक्रवारी सायंकाळी ८ च्या सुमारात वारजे परिसरात गोळीबाराचा थरार पाहायला मिळाला. येथील एका सलूनमध्ये ३ ते ४ अज्ञात हल्लेखोरांनी अचानक घुसून गोळीबार केला, ज्यामध्ये दोन जण जखमी झाले आहेत. भरवस्तीत आणि वर्दळीच्या वेळी झालेल्या या गोळीबारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, या घटनेमुळे पुण्यातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर झाला आहे.

वारजे परिसरातील या गोळीबाराची माहिती मिळताच पोलिसांनी वेगवान हालचाली करत एका संशयित तरुणाला ताब्यात घेतले आहे. सायंकाळच्या वेळी परिसरात मोठी गर्दी असतानाच हा थरार घडला. धक्कादायक म्हणजे, गोळीबार करत असताना बंदूक तरुणाच्या हातातच फुटल्याने तो स्वतःही जखमी झाला असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी सुरू केली आहे. या गोळीबाराचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करून गुन्ह्यामागील मूळ शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.




पुण्यातील गोळीबाराच्या घटनांनी यापूर्वीही शहराला हादरवून सोडले आहे, मात्र आज भरवस्तीत आणि रहदारीच्या ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याआधीच्या बहुतांश घटना गँगवॉर किंवा टोळीयुद्धातून घडल्याचे समोर आले होते, त्यामुळे आजचा हा थरारही त्याच संघर्षाचा भाग आहे का, हे शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. याप्रकरणी पुणे पोलीस आता काय पावले उचलतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, भविष्यात अशा हिंसक घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून अधिक ठोस आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

पान १ वरून...

### फरार असतानाही 'व्यवहार' सुरूच

की, आरोपीची पत्नी फरारी असताना तिची ओळख कशी पडताळण्यात आली आणि इतक्या वेगात सर्व प्रशासकीय प्रक्रिया कशा पूर्ण करण्यात आल्या? महसूल आणि नोंदणी विभागाने नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याऐवजी या व्यवहारात विशेष सवलती दिल्याचा संशय व्यक्त होत आहे.

दरम्यान, या संदर्भात संशयाची साखळी वाढत असताना नायब तहसीलदार पेडवी यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात, संबंधित फेरफार नोंद कार्यालयात आली होती; मात्र पुढील कार्यवाहीसाठी कोणीही हजर न राहिल्याने ती नोंद रद्द करण्यात आल्याचे सांगितले. तथापि, मूळ खरेदीखत अद्याप वैध असल्याने भविष्यात ही नोंद पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संपूर्ण प्रकरणामुळे दुय्यम निबंधक कार्यालय, तहसीलदार आणि तलाठी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. फरारी महिलेची ओळख कोणी आणि कशी पडताळली, अटकेच्या दिवशीच नोटीस कशी प्रसिद्ध झाली, तसेच या व्यवहारामागे कोणाचा वरदहस्त होता, याचा सखोल तपास करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### शिरूरमध्ये महिलेची रस्त्यावरच प्रसूती!

मिळताच डॉक्टर सुनिता पोटे, नगरसेविका पूजा पोटावळे घटनास्थळी दाखल झाले.

त्या वेळी महिलेने रस्त्यावरच बाळाला जन्म दिला होता. नवजात बालक श्वास घेत नव्हते वातावरणात क्षणभर तणाव निर्माण झाला. पण डॉक्टर सुनिता पोटे यांनी आपल्या कौशल्याने तात्काळ उपचार सुरू केले आणि काही क्षणांतच बाळाने पहिला रडण्याचा आवाज काढला! तो आवाज ऐकताच काही क्षणांपूर्वी काळजाचा ठोका चुकलेल्या नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आणि लगेचच टाळ्यांचा कडकडाट, आनंदाचा जल्लोष सुरू झाला.

या संपूर्ण घटनेत रिक्षाचालक, मेडिकल स्टोअर चालक, स्थानिक महिला, पत्रकार यांच्यासह सर्वांनी मिळून दिलेली मदत ही माणुसकीचे जिवंत उदाहरण ठरली. त्यानंतर आई व बाळाला मिरा नर्सिंग होम येथे दाखल करण्यात आले असून दोघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ. सुनिता पोटे यांनी दिली. ही घटना केवळ एका बाळाच्या जन्माची नाही, तर संकटाच्या क्षणी एकत्र आलेल्या समाजाची, जिवंत माणुसकीची आणि संवेदनशीलतेची कहाणी आहे. अडचणीच्या काळात जात, धर्म, श्रीमंती-गरीबी यांचे भेद विसरून मदतीला धावून येणारे हात अजूनही या समाजात आहेत आणि म्हणूनच - माणुसकी अजून जिवंत आहे!

### *गायत्री मंदिरात भरदिवसा दागिन्यांची चोरी!*

कोतवाली पोलिसांकडे तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रदीप बडे करीत आहेत. गजबजलेल्या भागात दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# देशभरात वीज मागणीचा 'शॉक'

**प्रतिनिधी । मुंबई**

देशभरात वाढत्या तापमानामुळे आणि एअर कंडिशनर, कूलर यांसारख्या उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे भारतातील वीज मागणीने हंगामी उच्चांक गाठला आहे. गुरुवारी देशातील शिखर वीज मागणी २४० गिगावॅटपर्यंत पोहोचली. ऊर्जा मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २३ एप्रिल रोजी दिवसातील सर्वाधिक पुरवठा २४०.१२ गिगावॅट इतका नोंदवला गेला. त्याआधी २२ एप्रिल रोजी हा आकडा २३९.७० गिगावॅट होता. यंदाच्या उन्हाळ्यातील हा आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर असून, तज्ज्ञांच्या मते येत्या काही दिवसांत मागणी आणखी वाढू शकते. २०२३ च्या सप्टेंबरमध्ये २४३.२७ गिगावॅटची नोंद झाली होती. हा दुसऱ्या क्रमांकाचा उच्चांक लवकरच मागे पडू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. भारताचा आतापर्यंतचा सर्वकालीन शिखर वीज मागणीचा विक्रम मे २०२४ मध्ये २५० गिगावॅट इतका नोंदवला गेला होता. गेल्या वर्षी जून २०२५ मध्ये २४२.७७ गिगावॅटची मागणी नोंदली गेली होती. मात्र, ती सरकारच्या २७७ गिगावॅटच्या अंदाजापेक्षा कमी होती. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात वीज मागणी तुलनेने कमी होती. १६ एप्रिल रोजी २३४.८१ गिगावॅटची मागणी नोंदली गेली, तर १७ एप्रिलला ती झपाट्याने वाढून २३८.९४ गिगावॅटवर पोहोचली.

# जिंजीवर भगवा, देशभर संदेश

## ▪ ‘आपला मावळा’ची महाराष्ट्र दिनी दमदार एंट्री ▪ शिवनेरी ते जिंजी प्रवास ▪ स्वराज्याच्या तिसऱ्या राजधानीत भगवा फडकावून गडसंवर्धनाचा देशव्यापी संदेश




**पारनेर : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या कुशीत सुरू झालेली गड-किल्ले स्वच्छता व संवर्धनाची चळवळ आता राज्याच्या सीमा ओलांडत ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून आपला मावळा या उपक्रमाची सुरुवात झाली आणि गेल्या वर्षभरात या मोहिमेने युवकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांवर राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमांमुळे ही चळवळ लोकचळवळ बनली असून, आता ती थेट तमिळनाडूपर्यंत पोहोचत आहे.

खासदार नीलेश लंके यांनी अहिल्यानगर येथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आपला मावळा संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, उपाध्यक्ष नगरसेवक योगीराज गाडे, प्रा. सीताराम काकडे, आदित्य जीवनगोरे (धाराशिव), अविनाश बानकर, जीशान शेख (सोलापूर) आदी उपस्थित होते.

### जागतिक वारसा संवर्धनाशी सुसंगत पाऊल

*हा उपक्रम युनेस्को च्या वारसा जतन संकल्पनेशी सुसंगत आहे. ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन, स्वच्छता आणि जागतिक स्तरावर वारशाबाबत जनजागृती करण्याचा महत्त्वाचा उद्देश या मोहिमेमागे आहे.*

### ‘आपला मावळा’ बनतेय देशव्यापी आंदोलन

*आपला मावळा ही चळवळ आता केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता देशपातळीवर पोहोचत आहे. युवकांचा वाढता सहभाग, ऐतिहासिक स्थळांविषयी जागरूकता आणि स्वच्छतेबाबतची बांधिलकी यामुळे ही मोहीम अधिक व्यापक होत आहे. महाराष्ट्र दिनी जिंजी किल्ल्यावर होणारा हा उपक्रम गडसंवर्धन चळवळीला नवे बळ देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.*

### तिसऱ्या राजधानीचा ऐतिहासिक गौरव

*तमिळनाडूमधील जिंजी किल्ला हा स्वराज्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा किल्ला मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दक्षिण दिग्विजयानंतर या किल्ल्याचे सामरिक महत्त्व अधोरेखित झाले. पुढे छत्रपती राजाराम महाराज यांनी औरंगजेबाच्या मुघल सैन्याशी लढा देताना याच किल्ल्यावरून जवळपास ७-८ वर्षे मराठा साम्राज्याची धुरा सांभाळली. त्यामुळे जिंजी किल्ला हा स्वराज्याच्या चिकाटीचा, पराक्रमाचा आणि अढळ जिद्दीचा प्रतीक म्हणून ओळखला जातो.*

### जिंजी किल्ल्यावर भव्य उपक्रम

*महाराष्ट्र दिन (दि. १ मे) निमित्त जिंजी किल्ला येथे विशेष स्वच्छता मोहीम आणि भगवा ध्वज फडकावण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शेकडो स्वयंसेवक या मोहिमेत सहभागी होणार असून, गड परिसरातील प्लास्टिक व कचरा हटवून स्वच्छता राखण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार आहे. या उपक्रमातून स्वराज्याचा अभिमान, स्वच्छतेचा संकल्प हा दुहेरी संदेश देशभर पोहोचवण्याचा प्रयत्न होणार आहे.*




### तंजावरच्या वारशाची जोड

*या मोहिमेस बाबाजी महाराज यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तंजावर हे मराठा इतिहासाशी निगडित महत्त्वाचे केंद्र असून, व्यंकोजी राजे भोसले यांनी येथे मराठा सत्तेची पायाभरणी केली होती. त्यामुळे या उपक्रमाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची दुहेरी जोड लाभत आहे.*

### वर्षभराच्या मोहिमेचा परिपाक

*आपला मावळा उपक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात शिवनेरी किल्ला, सिंहगड किल्ला, प्रतापगड किल्ला, लोहगड किल्ला, साल्हेर किल्ला, सिंधुदुर्ग किल्ला यांसारख्या गडांवर सातत्याने स्वच्छता व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. शेकडो स्वयंसेवकांनी श्रमदान करत गड परिसरातील प्लास्टिक कचरा हटवला, पर्यावरणपूरक पर्यटनाचा संदेश दिला आणि गड आपला, जबाबदारी आपली ही भावना जनमानसात रुजवली.*

### सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश

*या उपक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र आणि तमिळनाडू यांच्यातील सांस्कृतिक बंध अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला आहे. भरतनाट्यम, पोवाडा, ढोल-ताशे, मल्लखांब, लाठी-काठी यांसारख्या पारंपरिक कला सादर करून एक भारत, श्रेष्ठ भारत हा संदेश देण्यात येणार आहे.*

# कोर्टाचा दणका! मोबदला द्या, काम करा

## सहा महिन्यांत मोबदला देण्याचे हायकोर्टाचे आदेश शिरूर-बेल्हे राष्ट्रीय महामार्गावरील कामावर अट

**निघोज : प्रतिनिधी**

तालुक्यातील पठारवाडी परिसरातून जाणाऱ्या शिरूर-बेल्हे राष्ट्रीय महामार्गामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. बाधित जमिनींचे नवीन कायद्याप्रमाणे भूसंपादन करून सहा महिन्यांच्या आत मोबदला देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. मोबदला दिल्याशिवाय महामार्गाचे पुढील काम करू नये, अशी स्पष्ट अटही न्यायालयाने घातली आहे.

### ‘मोबदल्याशिवाय काम कसे?’

*या प्रकरणात शेतकऱ्यांनी ॲड. रामदास घावटे व ॲड. दत्तात्रय मरकड यांच्या माध्यमातून न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणीदरम्यान खंडपीठाने शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेत सरकारलाच सवाल केला की, भूसंपादन व मोबदला न देता काम कसे सुरू ठेवले? त्यानंतर बाधित क्षेत्राचे मोजमाप करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे आणि निश्चित कालावधीत भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले.*



### जिल्हा मार्ग ते राष्ट्रीय महामार्ग

*शिरूर-बेल्हे हा मार्ग सुरुवातीला प्रमुख जिल्हा मार्ग होता. १९८१ मध्ये राज्य मार्ग, २००१ मध्ये राज्य महामार्ग आणि २०१८ मध्ये राष्ट्रीय महामार्ग म्हणून त्याचे रूपांतर झाले. या मार्गाच्या रुंदीकरण व मजबुतीकरणासाठी केंद्र सरकारकडून सुमारे ४०० कोटींचा निधी मंजूर झाला असून सध्या काम युद्धपातळीवर सुरू आहे.*

### समृद्धीप्रमाणे भरपाईची मागणी

*या महामार्ग विस्तारामुळे पारनेर तालुक्यातील सुमारे १५ गावांतील शेतकरी बाधित झाले आहेत. अनेकांना यापूर्वीच्या संपादनाचा मोबदला मिळालेला नसल्याने समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. न्यायालयाचा हा निर्णय सध्या केवळ पठारवाडीतील याचिकादार शेतकऱ्यांपुरता मर्यादित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.*

### वळणांवर नाराजी

*पठारवाडी फाटा परिसरात ‘एस’ आकाराचे धोकादायक वळण निर्माण झाले असून एकाच ठिकाणी तीन तीव्र वळणे तयार झाल्याने अनेक अपघात घडले आहेत. ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभेत रस्ता पूर्वीच्या जागी करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने दखल न घेतल्याने ही बाबही न्यायालयात मांडण्यात आली.*

### कारवाईचा इशारा

*न्यायालयाने ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत संबंधित प्रशासनाला आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. आदेशांची अंमलबजावणी न झाल्यास कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर झाली.*

# कन्हैयाचा कर्तृत्ववान वारस

## मच्छिंद्रशेठ लंके यांचा वाढदिवस जल्लोषात



**निघोज : प्रतिनिधी**

कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचा वाढदिवस निघोज येथील कन्हैया दूध उद्योग समूहाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगला.

### मान्यवरांची उपस्थिती

*या कार्यक्रमास शिवाजीराव लंके, अर्जुन लामखडे, माऊली वरखडे, दिलीप ढवण, उत्तमराव लामखडे, संतोष ढवण, रमेश वरखडे, भास्करराव कवाद, विजय वराळ, कैलास कवाद, रवींद्र लंके, मयुर लंके, पंढरीनाथ लंके, पोपट लंके, राजेंद्र लामखडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर कवाद व रविशेठ लंके यांनी केले. शेवटी सोमनाथ वरखडे, विजय वराळ आणि दिलीप ढवण यांनी उपस्थितांचे आभार मानले. निघोजच्या विकासात उद्योग, समाजकारण आणि युवा नेतृत्वाचा संगम घडवणाऱ्या मच्छिंद्रशेठ लंके यांच्या कार्याची झलक या वाढदिवस सोहळ्यातून पाहायला मिळाली.*

### युवा उद्योजक म्हणून नावलौकिक

*उपाध्यक्ष अर्जुन लामखडे यांनी मच्छिंद्रशेठ लंके यांच्या उद्योजकीय यशाचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी राज्यात एक यशस्वी युवा उद्योजक म्हणून नाव कमावले आहे. मोठ्या उद्योगपतींसोबत असलेले त्यांचे संबंध आगामी काळात तालुक्यातील युवकांसाठी नवे अवसर निर्माण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.*

### विविध संस्थांकडून सत्कार

*मळगंगा यात्रा समिती, ग्रामपंचायत, पत्रकार संघ, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने मच्छिंद्रशेठ लंके यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये मळगंगा यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, तसेच रविशेठ, पंढरीनाथ व मयुर लंके यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदविला.*

### कन्हैयामुळे रोजगाराची दिशा

*उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, कन्हैया दूध उद्योग समूहामुळे निघोज व परिसरातील हजारो नागरिकांना रोजगार व व्यवसायाची संधी मिळाली आहे. उद्योगामुळे गावाच्या विकासाला गती मिळाली असून कन्हैयाचे नाव देशभर पोहोचल्याचा अभिमान निघोजकरांना आहे.*

### यात्रा समितीत लंके यांचे योगदान

*मळगंगा यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी सांगितले की, कन्हैया समूहाचे संस्थापक स्व. शांताराम लंके यांनी यात्रांसाठी दिलेल्या योगदानाचा वारसा मच्छिंद्रशेठ लंके पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे यात्रा अधिक भव्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले.*

# निरोपाच्या अश्रूंमध्ये स्वप्नांची भरारी

## वडनेर बु. शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांचा भावनिक निरोप



**वडनेर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडनेर बु. येथे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. शाळेच्या प्रांगणात आनंद, आठवणी आणि विरहाच्या भावनांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

### निरोपाच्या क्षणी भावनांचा पूर

विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू आणि चेहऱ्यावरचे स्मित या क्षणांची भावनिकता अधोरेखित करत होते. टाळ्यांच्या गजरात दिलेला निरोप आणि आठवणींनी भारलेली भाषणे यामुळे वातावरण भारावून गेले. हा कार्यक्रम केवळ निरोपाचा नव्हता, तर विद्यार्थ्यांना नव्या स्वप्नांची दिशा देणारा ठरला. उपस्थितांनी या संस्मरणीय क्षणांचा मनापासून आस्वाद घेतला.

### मार्गदर्शनातून प्रेरणेची ज्योत

यावेळी विद्या दिघे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त आणि मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. स्वप्न मोठे ठेवा आणि त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा, असा मोलाचा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल नऱ्हे, अरुण चौधरी, उपसरपंच आशाताई चौधरी, शिवाजीराव सुकाळे, स्वातीताई नऱ्हे, अनंथा जगदाळे, शिवाजी चौधरी, संतोष चौधरी, शिवाशेठ पवार, तानाजी चौधरी, किसन दादा चौधरी, महेश निचित, संतोष वाजे, राजू वाजे यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अरुण चौधरी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेच्या विविध स्पर्धांतील यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत शाळेच्या भिंती अधिक आकर्षक व बोलक्या करण्यासाठी मदत जाहीर केली. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक संभाजी एरंडे व शिक्षक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापकांनी उपस्थितांचे आभार मानले. निरोपाच्या या क्षणी डोळ्यांत अश्रू होते, पण मनात मात्र नव्या स्वप्नांची उज्ज्वल पहाट उगवत होती!

### आठवणींना उजाळा

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षणांना उजाळा देण्यात आला. लहानशा पावलांनी शाळेत प्रवेश केलेली ही मुले आज आत्मविश्वासाने पुढील वाटचालीकडे झेप घेत असल्याचे चित्र उपस्थितांना भावूक करून गेले.

# गटतट सोडा, विकासाला लागा!

## आमदार काशिनाथ दाते यांचा दमदार इशारा; राष्ट्रवादीची आढावा बैठक संपन्न

**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर शहरातील जिल्हा बँकेच्या सभागृहात आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी राजकीय व संघटनात्मक वाटचालीस दिशा देणारी ही बैठक ठरली असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती यावेळी दिसून आली.

### विश्वास जिंकण्यासाठी त्रिसूत्री

*जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रामाणिकपणा, सातत्य आणि जनसंपर्क या त्रिसूत्रीवर काम करणे आवश्यक असल्याचे दाते यांनी नमूद केले. शासकीय कार्यालयांमध्ये संघटनात्मक पदांचा योग्य वापर करून सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे ही पदाधिकाऱ्यांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.*



### उपस्थित मान्यवर

*या बैठकीस जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, ज्येष्ठ नेते प्रभाकर शेठ कवाद, मतदारसंघ अध्यक्ष विजय औटी, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा कार्याध्यक्ष सुधामती कवाद, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, जिल्हा उपाध्यक्ष सोनाबाई चौधरी, युवा तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, डी. आर. शेंडगे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर, उपाध्यक्ष रेश्मा गलांडे, आर. एस. कापसे, डॉ. प्रदीप दाते, मंगेश शेठ दाते, हरिष काका दावभट, राजेंद्र औटी, अनिल देठे, गोकुळ मामा काकडे, साहेबराव वाफारे, प्रदीप वाळुंज, देवराम मगर, अंजुम पठाण, सोनाली कुलथे, निलम गोसावी, अनिल मदगे, रामदास ढोले, संतोष सालके, पिनु रोहोकले, सुभाष सासवडे, संतोष मोरे, बाळासाहेब सोबले, बाबासाहेब दाते, बाळासाहेब रोकडे, सुभाष ठाणगे, राहुल तामखडे, जयसिंग कर्डिले, गणेश शिंदे, अक्षय गोरडे, सुनील रोकडे, अंकुश काशिद यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

### बी.एल.ए. नेमणुकीबाबत मार्गदर्शन

*मतदारसंघातील बूथ पातळीवरील संघटन मजबूत करण्यासाठी बी.एल.ए. (बूथ लेव्हल एजंट) नेमणुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथवर सक्रिय राहून पक्षाचे काम बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.*

### संघटन बळकटीसाठी दिशा

*बैठकीदरम्यान पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करून त्यांना सक्रिय व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे स्पष्टपणे सांगण्यात आले.*

### नव्या नियुक्त्यांनी नवे बळ

*बैठकीदरम्यान विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. राष्ट्रवादी दिव्यांग सेलच्या अध्यक्षपदी रविंद्र धोंडीबा आहेर, तालुका राष्ट्रवादी सहकार सेलच्या अध्यक्षपदी बबनराव पायमोडे, सामाजिक न्याय विभागाच्या कार्याध्यक्षपदी दत्तात्रय तुळशीराम सरोदे यांची निवड करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उपाध्यक्षपदी सुरेश काशिनाथ परंडवाल, राष्ट्रवादी पदवीधर सेलच्या अध्यक्षपदी राहुल सासवडे, पारनेर शहराध्यक्षपदी राजेंद्र औटी आणि उपाध्यक्षपदी सुनील गाडगे यांची नियुक्ती करण्यात आली.*

### नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा

*या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत आमदार काशिनाथ दाते यांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन केले. या आढावा बैठकीमुळे पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत होऊन विकासकामांना निश्चितच गती मिळेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.*

### विकासाभिमुख राजकारण

*आमदार काशिनाथ दाते यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून राष्ट्रवादी-महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून, आता प्रत्येक कार्यकर्त्याने आपली नैतिक जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. गावपातळीवरील गटतटाचे राजकारण बाजूला ठेवून विकासाभिमुख राजकारणाची पायाभरणी करण्यावर विशेष भर देण्याचे त्यांनी आवाहन केले.*

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Ecitor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com